म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय व्या. वा.
दा. क्र. ३०१८

# आमचे गांधी

IRBK-0103018
IRBK-0103018

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वा. नं. २९

# गांधीजी



-. आ वा. २८० २५/३/५२
दा. क्र.
३०१८

आमचे राष्ट्रपुरुष-१

# आमचे गांधीजी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२८८

लेखक

दामोदर विष्णु कुलकर्णी

किंमत ८ आणे

IRBK-0103018

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर

शारदा विहार मंडळ.
वासुदेव बिल्डिंग नं. ३, घरोज लेन,
ठाकुरद्वार, मुंबई २.

प्रकाशक :—
दामोदर विष्णु कुलकर्णी
कोल्हापूर.

एकमेव विक्रेते
महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर

मुद्रक :
जयराम दिपाजी देसाई,
राष्ट्रवैभव प्रिंटिंग प्रेस,
गिरगांव, मुंबई ४

# आमचे राष्ट्रपुरुष

'बालमित्र माले'चा पहिला सर 'आमचे सण'; त्या सरांत संक्रांत, महाशिवरात्र, दसरा इ. फुलें ओंवलीं जात आहेत.

याच मालेचा दुसरा सर 'आमचे राष्ट्रपुरुष'; परतंत्र भारताला ज्या थोर स्त्रीपुरुषांनीं आपलें रक्त देऊन स्वतंत्र राष्ट्र म्हणून मानाचें स्थान मिळवून देण्याचे प्रयत्न केले व अद्यापहि चालविले आहेत त्यांची ओळख बालमित्रांना या मालेतर्फे करून देण्याचा संकल्प आहे.

राजकीय गुलामगिरी हा आमचा मोठा रोग आज आम्हांला वाटत असला तरी या विस्तृत देशाच्या प्रचंड लोकसमुदायाला लागलेले बेकीचे, बेकारीचे, अज्ञानाचे, दारिद्र्याचे, इत्यादि रोगहि लहानसहान नाहींत, दुर्लक्ष करण्याजोगे नाहींत. किंबहुना राजकीय गुलामगिरी ही या इतर सर्व रोगांची साकल्यानें परिणति आहे असें म्हटलें तरी चालेल. या अनेक प्रकारच्या रोगांशीं झगडण्याला ज्या शूर वीरपुरुषांनीं व स्त्रियांनीं जनतेला तयार केलें, त्यांनाहि आमच्या देवघरांत 'दैवतें' म्हणून आम्हीं पुजूं. उगवत्या पिढीला या दैवतांची, त्यांच्या कर्तृत्वाची आणि त्यांच्या आमच्यावरील ऋणाची जाणीव करून देणें आणि अशा रीतीनें या पिढींतल्या मुलामुलींत योग्य स्वाभिमान व आपल्या सामाजिक कर्तव्याची जाणीव उत्पन्न करण्याला, तसेंच वैयक्तिक चारित्र्याची जोपासना करण्याला मदत करणें हें या मालेचें उद्दिष्ट आहे.

अर्थात् हीं पुस्तकें बालांकरितां असल्यामुळें त्यांतील भाषा सुबोध आणि मांडणी चटकदार असणें अवश्य आहे, इकडे आमचें लक्ष असणारच. त्यासाठीं चरित्रलेखन अभिनव पद्धतीनें केलेलें यांत आढळून येईल. 'गांधीजी', 'नेताजी', 'पंडितजी', 'लोकमान्य', 'न्यायमूर्ति', 'भारतसेवक' अशीं पुस्तकें काढण्याची आमची योजना आहे. आमच्या बालमित्रांना ही माला आवडेल अशी आम्हांला आशा आहे.

**महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.**

प्रकाशक :—
दामोदर विष्णु कुलकर्णी
कोल्हापूर.

एकमेव विक्रेते
महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर

मुद्रक :
जयराम दिपाजी देसाई,
राष्ट्रवैभव प्रिंटिंग प्रेस,
गिरगांव, मुंबई ४

# आमचे राष्ट्रपुरुष

'बालमित्र माले'चा पहिला सर 'आमचे सण'; त्या सरांत संक्रांत, महाशिवरात्र, दसरा इ. फुलें ओंवली जात आहेत.

याच मालेचा दुसरा सर 'आमचे राष्ट्रपुरुष'; परतंत्र भारताला ज्या थोर स्त्रीपुरुषांनीं आपलें रक्त देऊन स्वतंत्र राष्ट्र म्हणून मानाचें स्थान मिळवून देण्याचे प्रयत्न केले व अद्यापहि चालविले आहेत त्यांची ओळख बालमित्रांना या मालेतर्फे करून देण्याचा संकल्प आहे.

राजकीय गुलामगिरी हा आमचा मोठा रोग आज आम्हांला वाटत असला तरी या विस्तृत देशाच्या प्रचंड लोकसमुदायाला लागलेले बेकीचे, बेकारीचे, अज्ञानाचे, दारिद्र्याचे, इत्यादि रोगहि लहानसहान नाहींत, दुर्लक्ष करण्याजोगे नाहींत. किंबहुना राजकीय गुलामगिरी ही या इतर सर्व रोगांची साकल्यानें परिणति आहे असें म्हटलें तरी चालेल. या अनेक प्रकारच्या रोगांशीं झगडण्याला ज्या शूर, वीरपुरुषांनीं व स्त्रियांनीं जनतेला तयार केलें, त्यांनाहि आमच्या देवघरांत 'दैवतें' म्हणून आम्हीं पुजूं. उगवत्या पिढीला या दैवतांची, त्यांच्या कर्तृत्वाची आणि त्यांच्या आमच्यावरील ऋणाची जाणीव करून देणें आणि अशा रीतीनें या पिढींतल्या मुलामुलींत योग्य स्वाभिमान व आपल्या सामाजिक कर्तव्याची जाणीव उत्पन्न करण्याला, तसेंच वैयक्तिक चारित्र्याची जोपासना करण्याला मदत करणें हें या मालेचें उद्दिष्ट आहे.

अर्थात् हीं पुस्तकें बालाकरितां असल्यामुळें त्यांतील भाषा सुबोध आणि मांडणी चटकदार असणें अवश्य आहे, इकडे आमचें लक्ष असणारच. त्यासाठीं चरित्रलेखन अभिनव पद्धतीनें केलेलें यांत आढळून येईल. 'गांधीजी', 'नेताजी', 'पंडितजी', 'लोकमान्य', 'न्यायमूर्ति', 'भारतसेवक' अशीं पुस्तकें काढण्याची आमची योजना आहे. आमच्या बालमित्रांना ही माला आवडेल अशी आम्हांला आशा आहे.

**महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.**

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| १ सोन्याचें कडें ... ... ... | ५ |
| २ पायाची शपथ ... ... ... | ८ |
| ३ सत्याग्रह ... .... ... | १० |
| ४ विजयी वीर ... ... ... | १४ |
| ५ कर्तव्यपालन ... ... ... | २० |
| ६ जरीचें उपरणें ... ... ... | २३ |
| ७ खमंग भोजन ... ... ... | २५ |
| ८ कडू काढा ... ... ... | २८ |
| ९ कंगालांचा पुढारी ... ... | ३० |
| १० काटकसर ... ... ... | ३३ |
| ११ नंगा फकीर .... ... ... | ३५ |
| १२ कॉफीचा पेला ... ... ... | ३८ |
| १३ कौमुदीचे दागिने ... ... | ४२ |

T. मा.-मा. २८० २५/३/५८

# आमचे गांधीजी

## सोन्याचें कडें ★ ★ ★ १

फार फार वर्षें झालीं. गांधीजी लहान होते तेव्हांची गोष्ट. त्यावेळीं ते महात्माजी नव्हते. फक्त मोहनदास होते. त्यावेळीं त्यांचें वय तेरा चवदा वर्षांचें असेल.

गांधीजींच्या मधल्या बंधूंचे कांहीं मित्र होते. ते मित्र चांगले नव्हते. त्यांची संगत वाईट होती.

गांधीजींच्या बंधूंना ही वाईट संगत लागली. संगतीचा परिणाम भोवल्यावांचून कसा राहणार? वाईट संगतीबरोबर वाईट संवयीहि आल्याच.

चांगल्या संवयी लागण्यासाठीं जन्मभर चंदनाप्रमाणें झिजावें लागतें, पण वाईट संवयी मात्र एका क्षणांत लागतात.

मधल्या भावाबरोबर धाकटा मोहनहि या मोहाला बळी पडला. दोघाहि भावांना फार वाईट संवयी लागल्या. वाईट संवयींचे चोचले फुकट होत नसतात. त्यांना पैसे लागतात. पण हे पैसे देणार कोण? ते आणावयाचे कोठून? शेवटीं त्यांनीं उधारी व उसनवारी केली. सुमारें पंचवीस रुपये कर्ज झालें.

सावकाराचा सारखा तगादा लागला. कर्ज भागविणें भाग होतें. गांधीजींच्या मधल्या भावाच्या हातांत सोन्याचें एक छानदार कडें होतें.

ह्या कड्यांतून गुपचुप एक तोळा सोनें कापून घ्यावें असा भावा-भावांनीं मिळून विचार केला.

विचार ठरावयाचा अवकाश कीं, त्यांनीं तो तावडतोब अमलांत देखील आणला. अगदीं चुपचापपणें एक तोळा सोनें कापून घेतलें. तें कोणास न कळवितां बाजारांत नेऊन विकलें. मग मिळालेल्या पैशांतून कर्ज भागविलें.

जिवाला लागलेली एक रुखरुख नाहींशी झाली. तेवढ्या पुरता जीव शांत झाला. पण.......?

हा पण फार मोठा होता. जीव शांत झाला, पण मन शांत झालं नाहीं. जिवाला लागलेल्या कर्जाच्या रुखरुखीपेक्षां मनाला फार भयंकर मोठी रुखरुख लागून राहिली.

मोहनला अन्न गोड लागेना. पाणी गोड लागेना. कशांतहि मन रमेना. तो अगदीं बेचैन होऊन गेला.

आपण गुपचुप सोनें विकलें, हें चांगलें केलें नाहीं असें त्याचें निर्मळ मन त्याला टाहो फोडून सांगूं लागलें.

मन म्हणूं लागलें, 'मोहन, तूं बाळ प्रल्हादाची गोष्ट वाचली आहेस ना? सत्यासाठीं त्यानं किती छळ सोसला बरं! बाळ प्रल्हादाला विष प्यायला दिलं. त्याला कड्यावरून फेकला. उकळत असलेल्या तेलाच्या कढईंत टाकला. तरी त्यानें सत्य सोडलं नाहीं. तो यमयातना भोगत होता, तरी खोटं बोलला नाहीं. प्रत्यक्ष जन्म देणारा बाप छळ करीत होता अन् बाळ प्रल्हाद सत्यासाठीं झगडत होता. याच्या उलट तुझे वडील अत्यंत प्रेमळ आहेत. कबा गांधींच्या इतका मायाळू माणूस त्रिभुवनांत सांपडावयाचा नाहीं. अशा प्रेमळ पित्याशीं तूं लबाडी केलीस, हें चांगलं नव्हे. जा खऱ्या गोष्टी कबाजींना सांग. प्रल्हादप्रमाणें सत्याचा पुजारी हो!'

मोहन मनाचा निर्मळ होता. हाडाचा सच्चा होता. फक्त वाईट संगतीची घाण त्याच्यावर सांचली होती.

झालेला सर्व प्रकार वडिलांना सांगण्याचा मोहननें ठाम निश्चय केला. पण त्यांना सांगायचें कसें ? कबाजी रागावणार नाहींत, मारणार नाहींत, हें मोहनदासास माहीत होतें. पण ते स्वतःला मात्र फार त्रास करून घेतील, आपलें डोकें बडवून घेतील, याची त्याला फार भीति वाटत होती.

त्यानें क्षणभर विचार केला. काय व्हावयाचें असेल तें होऊं दे, पण खरें सांगून, चूक कबूल करून मन मोकळें करावयाचें असें त्यानें ठरविलें.

मग त्यानें घडलेली सर्व हकीकत एका कागदावर लिहून काढली. त्या कागदाची घडी केली. नंतर तो वडिलांचे खोलींत गेला.

कबा गांधी खाटेवर निजले होते. ते निजूनच असत, कारण ते आजारी होते. लांब मुदतीचा, लवकर बरा न होणारा आजार त्यांना झाला होता.

मोहननें ती चिठी मुकाट्यानें कबाजींच्या हातांत दिली व आपण खालीं मान घालून कोपऱ्यांत उभा राहिला.

चिठी वाचण्यासाठीं कबाजी एका अंगावर उठून बसले. त्यांनीं चिठी वाचली. क्षणभर डोळे मिटून स्वस्थ बसले. त्यांनीं एक लांब सुस्कारा सोडला. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या.

मोहनदास सर्व प्रकार गोंधळलेल्या नजरेनें पाहात होते. कबाजी रागावले नाहींत. त्यांनीं आरडाओरड केली नाहीं. मोठाले डोळे करून पाहिलें नाहीं कीं तोंडांतून चकारशद्व काढला नाहीं. ते स्वस्थ निजले पण त्यांच्या डोळ्यांतून वाहणारा अश्रूंचा पूर थांबला नव्हता.

वडिलांना झालेलें दुःख पाहून मोहनदासास फार वाईट वाटलें. त्याला रडूं कोसळलें. त्याला खराखुरा पश्चाताप झाला. त्याचें सारें पाप धुऊन गेलें. वडिलांचे प्रेमानें त्याला शुद्ध केलें.

आधींच निर्मळ असलेलें त्याचें मन अधिकच निर्मळ झालें. त्यावर सांचलेली सर्व घाण पार धुऊन गेली. त्या क्षणीं त्यानें प्रतिज्ञा केली:—मी वाईट गोष्ट करणार नाहीं. माझ्या हातून वाईट गोष्ट झालीच तर ती मी लपविणार नाहीं. मी जिवंत जीव असेपर्यंत खरें बोलेन.

★

---

## पायाची शपथ ★ ★ ★ २

गांधीजी मॅट्रिक पास झाले. मग पुढें काय करावयाचें हा प्रश्न उत्पन्न झाला. कॉलेजांत जावें व पदवी मिळवावी असें घरच्या मंडळींचें मत पडलें.

पण ही गोष्ट जोशीजींना आवडली नाहीं. जोशीजी हे गांधी कुटुंबाचे मित्र व सल्लागार होते. जोशीजींचें नांव मावजी दवे होतें. पण गांधीजींच्या घरची सर्व मंडळी त्यांना प्रेमानें जोशीजी म्हणत असत. ते गांधीजींच्या वडिलांचे जिवलग मित्र होते.

एके दिवशीं जोशीजी वाटेंत गांधीजींना भेटले. त्यांनीं विचारलें, 'काय मोहन, पुढें काय विचार ठरविला आहेस? काय होणार आहेस? वकील कीं डॉक्टर?'

'भाईजी म्हणतात कॉलेजचा शिक्षणक्रम पुरा कर.'

'मला वाटतें, तूं विलायतेला जाऊन बॅरिस्टर होऊन यावेंस. जातोस कां विलायतेला?'

'भाईजींनीं पाठविलं बानीं परवानगी दिली तर अगदीं आनंदानं जाईन.'

'तूं आईला विचारून ठेव. मीहि येऊन भाईजींची व आइची समजूत घालीन.'

'बरं, मग मी आज आईला विचारतों.'

विलायतेला जावें, खूप खूप शिकावें, थोर व्हावें, विद्वान बनावें, असें गांधीजींना फार फार वाटत असे. आतां जोशीजींनीं तीच गोष्ट सांगतांच, त्यांच्या मनानें जोरानें उचल खाल्ली. इतक्या दूर आई पाठवील का? आईनें विलायतेला जायला परवानगी नाहीं दिली तर?

शेवटीं गांधीजींनीं मनाचा हिय्या केला. ते आईजवळ गेले व आईला म्हणाले, 'बा, मी विलायतेला शिकावयास जाऊं काय? जोशीजी जा म्हणतात.'

'मोहन, इतक्या दूर तुला एकट्याला कसा पाठवायचा सांग बरं! तिथं ना जात ना गोत. कोणी मायेचं माणूस नाहीं. तूं अजून लहान आहेस. जीवा भावाला आलं तर कोण आहे का तिथं? कोण काळजी घेईल तुझी?

'बा, मी अगदीं जपून राहीन. माझी मी काळजी घेईन, तूं अगदीं निर्धास्त रहा. मला बॅरिस्टर व्हावसं वाटतं. मग मी जाऊं काय? सांग ना?

'विलायतेला गेलेलीं मुलं बिघडतात असं मी ऐकलं आहे. तिकडे गेल्यावर मांस खातात, दारू पितात आणि काय वाटेल ते अनाचार करतात म्हणे. म्हणून मला भीति वाटते बाबा तुला पाठवायची!'

'बा, मी तुझाच मुलगा आहेना! माझी तुला खात्री नाहीं? माझा तुला विश्वास वाटत नाहीं? मी वाईट वागेन असं वाटतं का तुला?'

'फार लांब तुला पाठवायचा आहे म्हणून मन तितकं तयार होत नाहीं बेटा. पण तू खूप खूप शिकावंस, शिकून मोठं व्हावंस, जगभर तुझी कीर्ति पसरावी, असं मला फार फार वाटतं.'

'बा, तुला तसं वाटतं ना? मग मला विलायतेला जायला परवानगी दे तर!'

'मी तशी परवानगी दिली असतीरे, पण——?

'पण काय बा? मी वाईट वागेन एवढंच तुला वाटतंना? मग तर मी तुझ्या पायाची शपथ घेऊन सांगतो,—

मी मांस कधींहि खाणार नाहीं.

मी दारूच्या थेंबाला प्राण गेला तरी स्पर्श करणार नाहीं.

मी परक्या बाईकडे आई आणि बहीण म्हणून पाहीन.

गांधींजीनी मातेच्या पवित्र पायाची शपथ वाहिली. माता माऊलीची खात्री पटली. जोशीजींनी सगळ्यांची समजूत घातली. भाईजींनी पैशाची व्यवस्था केली अन् गांधीजी बॅरिस्टर होण्यासाठीं विलायतेला रवाना झाले.

★

---

## सत्याग्रह ★ ★ ★ ३

हिंदुस्थानच्या पश्चिमेस, अरबी समुद्रापलीकडे एक मोठा अफाट प्रदेश आहे. या प्रदेशाला आफ्रिका खंड म्हणतात. या खंडांतील लोक फारच मागासलेले आहेत. त्यांना लिहितां वाचतां येत नाहीं. ते जंगलांत राहतात. या खंडाचा कांहीं भाग मात्र पूर्वी सुधारलेला होता. या देशाशीं पूर्वीपासून हिंदुस्थानचा व्यापार सुरू आहे. व्यापाराकरितां पुष्कळ हिंदी लोक तेथें जाऊन राहिले आहेत. व्यापार करून त्यांनीं पैसाहि खूब मिळविला आहे.

पुढें गोरे लोक या देशांत गेले. त्यांनीं हा प्रदेश काबीज केला. सर्व भागांवर आपली सत्ता बसविली. मग त्यांनीं मोठ्या प्रमाणांत शेती सुरू केली. फळबागा केल्या, मळे केले, सोन्याच्या व हिऱ्याच्या खाणी सुरू केल्या. पण या कामाला तेथें चांगले मजूर मिळेनात.

हिंदुस्थान सरकारनें आपल्या आफ्रिकेंतील गोऱ्या भाईबंदांना हिंदुस्थानांतून खूप मजूर पुरविले. अशा रीतीनें पुष्कळ हिंदी लोक आफ्रिकेंत राहावयास गेले. बहुतेक हिंदी लोक दक्षिण भागांतच राहत आहेत.

दादा अबदुल्ला या नांवाचे एक हिंदी गृहस्थ दक्षिण आफ्रिकेंत जाऊन राहिले होते. तेथें त्यांचा फार मोठा व्यापार होता. त्या-ठिकाणी त्यांचा एक मोठा दावा ( चाळीस हजार पौंडाचा ) चालला होता. तो चालविण्यास त्यांना एक हिंदी बॅरिस्टर पाहिजे होता.

गांधीजी विलायतेहून बॅरिस्टर होऊन आले होते. दादा अबदुल्लांची हिंदुस्थानांत मोठी पेढी होती. या पेढीच्या व्यवस्थापकांनीं दादा अबदुल्लांना गांधीजींचें नांव सुचविलें. त्यांनीं या गोष्टीस संमति दिली व गांधीजी दक्षिण आफ्रिकेंत गेले.

दादा अबदुल्लांच्या दाव्याच्या कामाकरितां गांधीजींना डरबानहून प्रिटोरियाला जावयाचें होतें. आगगाडीचें पहिल्या वर्गाचें तिकीट काढलेलें होतें. गांधीजी पहिल्या वर्गाच्या डब्यांत बसून निघाले. त्यांचा प्रवास सुरू झाला. एका स्टेशनावर आगगाडी थांबली. एक गोरा उतारू गांधीजींच्या डब्यांत आला. त्यानें गांधीजींच्याकडे पाहिलें व कपाळाला आठ्या घालून तो म्हणाला,

'काळा आदमी'

पहिल्या वर्गाच्या डब्यांत काळा हिंदी माणूस दिसतांच त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. तो ताडकन् खालीं उतरला व दोन अधिकाऱ्यांना घेऊन आला.

‘मिस्टर, या डब्यांतून खालीं उतरा आणि शेवटच्या डब्यांत जाऊन बसा.’ अधिकारी गरजून गांधींना म्हणाला.

‘हें पहा, माझ्याजवळ पहिल्या वर्गाचें तिकीट आहे’ गांधीजींनी सांगितलें.

‘पहिला वर्ग तुम्हां काळ्या लोकांच्या करितां नाहीं. उतरा अगोदर खालीं’ अधिकारी पुन्हा गरजला.

‘माझ्याजवळ या डब्यांत बसण्याचं तिकीट आहे. येथें बसावयाचा माझा रीतसर हक्क आहे. माझ्या हक्का-प्रमाणें मी येथेंच बसणार.’

‘तें कांहीं चालणार नाहीं. मुकाटपणें खालीं उतरा, नाहींतर शिपायाकडून बाहेर काढावें लागेल’

‘मी आपणहून माझी हक्काची जागा सोडणार नाहीं. तुमचा शिपाई मला खुशाल खालीं काढूं दे’

त्या अधिकाऱ्यांनीं जाऊन शिपायास बोलावून आणलें. शिपाई डब्यांत शिरला. त्यानें गांधीजींचा हात पकडला व त्यांना गचांडी मारून खालीं काढलें. त्यांचे सामान डब्यांतून खालीं फेकून दिलें.

गांधीजींनीं दुसऱ्या डब्यांत जाऊन बसावयाचें नाकारलें. गाडी निघून गेली. गांधीजी स्टेशनवरच थांबले. त्यांनीं आपल्या सामानाला हात लावला नाहीं. नंतर रेल्वेच्या नोकरांनीं तें सामान स्टेशनवरच्या एका खोलींत नेऊन ठेविलें. त्यांना ती सर्व रात्र उघड्यावर थंडींत कुडकुडत काढावी लागली.

सकाळीं गांधीजींनीं वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रारीची तार केली. त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. तरी पण त्यांचा आगगाडीचा पुढील प्रवास त्रास न होता झाला.

या पुढील प्रवास बगींतून व्हावयाचा होता. बगीचें तिकिट काढलें होतें. सर्व उतारू बगीच्या आंत बसले होते पण गांधीजी

हिंदी होते, काळे होते, गोऱ्या लोकांच्या मळ्यांत राबणाऱ्या मजुरांच्या जातीचे होते. मग त्यांना गोऱ्या उतारूंच्या शेजारीं बगीच्या आंत कोण बसूं देणार ?

बगी हांकावयास बसणाऱ्या माणसाच्या दोन्ही बाजूस दोन बैठका होत्या. त्यांपैकीं अेकीवर बगीवरचा गोरा अधिकारी बसत असे. पण तो स्वत: आंत बसला व त्या बगीहाक्याजवळ त्यानें गांधीजींना बसविलें.

हा गांधीजींचा मोठा अपमान होता. पण त्यांनीं तो मुकाट्यानें सहन केला. तक्रार केली नाहीं. हुज्जत घातली नाहीं. कारण त्यांना लवकर जावयाचें होतें. तक्रारी करीत बसण्यांत वेळ मोडणार होता.

अशा प्रकारें कांहीं मैल प्रवास झाला. नंतर त्या गोऱ्या अधिकाऱ्यास सिगारेट ओढावयाची तलफ आली. बगीच्या आंत बसून तंबाखू ओढावयाचा नाहीं असा नियम होता. त्यासाठीं तो अधिकारी बगीहाक्याजवळ बसणार होता. बगी थांबतांच तो बाहेर आला. जवळ पडलेलें एक घाणेरडें गोणपाट त्यानें बगी हाक्याजवळून घेतलें. तें पाय ठेवावयाच्या फळीवर आंथरलें. मग त्यानें गांधीजींना तेथें बसावयास सांगितलें. तेव्हां गांधीजी त्याला म्हणाले,

'हें पहा, खरं पाहिलं असतां माझी जागा आंत बसावयाची, पण ती माझी हक्काची जागा तुम्ही मला दिली नाहींत. या बाहेरच्या जागेवर तुम्हीच मला बसविलंत. आणि आतां उतरा म्हणतां याचा अर्थ काय ! तुम्हाला ही जागा हवी म्हणून मला तुमच्या पायाजवळ बसायला लावीत आहांत काय ? फार झालं तर मी आंत जाऊन बसेन पण तुमच्या पायाजवळ मुळींच बसणार नाहीं.'

इतकें गांधीजींचें बोलून व्हावयाच्या आंतच त्या गोऱ्या अधिकाऱ्यानें गांधीजींना बडवावयास सुरवात केली. ठोशामागून ठोसे बसूं

लागले त्या गोऱ्या धटिंगणानें गांधीजींचा दंड धरून त्यांना दरदर ओढावयास सुरवात केली. बसावयाच्या जागेजवळ एक पितळेचा दांडा होता. गांधीजींनीं तो घट्ट पकडून ठेवला.

तो गोरा गांधीजींना शिव्या देत होता, मारीत होता, दरदर ओढीत होता, पण गांधीजी अगदीं गप्प होते. तो गोरा दांडगा होता. व गांधीजी दुर्बल होते. तरी ते भ्याले नाहींत, त्यांनी आपली जागा सोडली नाहीं.

गांधीजी आपल्या हक्कासाठीं झगडत होते. सशक्ताशीं अशक्ताचा झगडा चालला होता. गांधीजी शांतपणें झगडत होते. त्यांचें म्हणणें 'सत्य' होतें आणि त्याचा त्यांनीं कसून आग्रह 'धरला' होता.

बगींतील उतारूंना गांधीजींची दया आली. ते त्या गोऱ्या अधिकाऱ्यास म्हणाले, 'अरे, कां उगाच त्या गरीब माणसास मारतोस ? त्याचं म्हणणं खरं आहे. तो रास्त तेंच बोलत आहे. त्याला त्याच्या पहिल्या जागेवर तुला जर बसवावयाचें नसेल तर मग त्याला आंत आमच्याजवळ बसव.'

'नाहीं, शक्य नाहीं.' तो गोरा ओरडून म्हणाला.

हें तो बोलला तरी आतां तो बराच नरम पडला होता. त्यानें गांधीजींना मारावयाचें बंद केलें. त्यांचा दंड सोडला पण शिव्या हासडण्याचे काम मात्र चालूंच होतें.

शेवटीं तो थकला. मग त्यानें पलीकडील बैठकीवर एक आफ्रिकन नोकर बसला होता, त्याला उठवून आपल्या पायाजवळच्या फळीवर बसविलें व आपण त्याच्या जागेवर जाऊन बसला.

गांधीजी आपल्या पहिल्याच जागेवर बसले. बगी सुरू झाली.

सत्याग्रहाचा विजय झाला.

★

## विजयी वीर ★ ★ ★ ४

दक्षिण आफ्रिकेंतील गोऱ्या सरकारनें तेथील हिंदी लोकांवर पुष्कळ त्रासदायक व अपमानकारक बंधनें घातलीं. १९०६ सालीं या जुलमी सरकारनें हिंदी लोकांवर अत्यंत अपमानकारक असा एक हुकूम बजावणारा कायदा केला.

त्या हुकूमांत लिहिलें होतें कीं, "ज्या हिंदी माणसास या देशांत राहावयाचें असेल त्यानें सरकारी परवाना काढलाच पाहिजे. आठ वर्षांहून अधिक वयाच्या प्रत्येक स्त्री पुरुषानें कोर्टांत जाऊन आपलें नांव, वय, जात, धंदा व राहावयाचें ठिकाण याची नोंद केली पाहिजे. व हाताच्या दहाहि बोटांचे ठसे दिले पाहिजेत. इतक्या गोष्टी केल्यावर परवाना मिळेल. हा परवाना सतत जवळ बाळगला पाहिजे. या हुकुमाविरुद्ध वर्तन करणारास दंड होईल, तुरुंगात घातलें जाईल व जरूर पडल्यास हद्दपारहि केलें जाईल."

या वेळीं गांधीजी दक्षिण आफ्रिकेंत राहत होते. त्यांनीं हा कायदा नाहींसा करून टाकण्याचा निश्चय केला. मग त्यांनीं तेथील प्रमुख हिंदी लोकांची एक सभा बोलाविली. सभेंत या कायद्यावर चर्चा केली. त्याच्या सर्व परिणामांचा विचार केला. या कायद्याचा प्रतिकार केलाच पाहिजे असें सभेचें मत पडलें. मग सर्व लोकांची एक जाहीर सभा घेण्यांत आली.

'वाटेल त्या हालअपेष्टा सोसूं पण हा हुकूम आम्ही मुळींच मानणार नाहीं.'

असा महत्त्वाचा ठराव सर्व सभेनें एकमतानें पास केला.

परवाने काढण्याची मुदत संपली पण लोकांनीं परवाने काढले नाहींत व ते देश सोडून निघूनहि गेले नाहींत. त्यांनीं हुकूम मुळींच पाळला नाही.

सरकार चिडून गेलें. सरकारी अधिकाऱ्यांनीं लोकांना पकडून, हुकूम मोडल्याबद्दल त्यांच्यावर खटले भरले. त्यांना शिक्षा ठोठावल्या. सत्याग्रही वीरांनीं तुरुंग भरून गेले.

गांधीजींनाहि अटक झाली. ज्या कोर्टांत ते वकील म्हणून बसत होते त्याच कोर्टांत ते कैदी म्हणून उभे होते. ते सत्याग्रही कैदी होते. बॅरिस्टरीपेक्षां केवढी मोठी मानाची पदवी मिळविली होती त्यांनीं! त्यांना दोन महिन्यांची साधी शिक्षा ठोठावण्यांत आली.

लोक कायदा मोडत होते. तुरुंगांत जात होते पण कोणीहि परवाना काढीत नव्हते.

कांहीं दिवसांनीं बातमी आली कीं सरकार तडजोडीस तयार आहे. मुख्य प्रधान जनरल स्मट्स् यांनीं गांधीजींना बोलावून सांगितलें कीं, लोक जर आपल्या मनानें परवाने काढीत असतील तर मग आम्ही हा कायदा रद्द करूं. पण अगोदर लोकांनीं परवाने काढले पाहिजेत.

गांधीजींनीं, एक वेळ सरकारवर विश्वास ठेवून पहावें असें ठरविलें. त्यांनीं तसें प्रमुख लोकांस सांगितलें व तडजोड मान्य केली.

कांहीं लोकांना ही गोष्ट आवडली नाहीं. गांधीजी सरकारला शरण गेले, सरकारला सामील झाले अशी कांहीं लोकांची समजूत झाली. परवाना काढावयाचा नाहीं असें अगोदर ठरविलें होतें. मग आतां परवाना कां काढावयाचा? ही अपमानकारक गोष्ट आहे अशीहि कांहीं लोकांची समजूत झाली.

अशा लोकांपैकीं मीर आलम हा एक होता. तो पठाण होता. गांधीजींचा पक्षकार होता. त्याला परवाना काढण्याची गोष्ट आवडली

नाहीं. त्याला वाटलें, गांधीजी अगोदर एक सांगतात पुन्हां मग दुसरेंच करा म्हणतात. हें चांगलें नाहीं.

गांधीजी स्वतः अगोदर परवाना काढणार होते. ते लोकांना उदाहरण घालून देणार होते म्हणून गांधीजी परवाना काढावयासाठीं चालले होते.

'कुठं निघालांत भाईजी ?' मीर आलमनें विचारलें.

'परवाना काढायला चाललों आहें मी. चला, तुम्ही येतां कां माझ्याबरोबर ?' एवढं बोलून गांधीजी पुढें चालले.

इतक्यांत मागील बाजूनें गांधीजींच्या डोक्यांत भला मोठा सोटा बसला.

'हे राम'

इतकेच शब्द गांधीजींच्या तोंडून बाहेर पडले. सोट्याचा तडाखा भयंकर बसला होता. त्या तडाख्याबरोबर गांधीजी खालीं पडले. ते तत्काळ बेशुद्धच झाले. सोट्यामागून सोटे हाणले जात होते. लाथा बुक्कयांचा तर वर्षावच चालला होता.

हा सर्व प्रकार भररस्त्यांत चालला होता. हळू हळूं लोक जमूं लागले तें पाहतांच मारेकऱ्यांनीं पळ काढावयास सुरवात केली. पण लोकांनीं त्यांचा पाठलाग केला व त्यांना पकडून ठेवलें.

त्या मारेकऱ्यांचा पुढारी मीर आलम होता. त्याला व त्याच्या साथीदारांना पोलीसांनीं आपल्या ताब्यांत घेतलें.

इकडे गांधीजी बेशुद्ध पडले होते. त्यांना शुद्धीवर आणण्याचें काम सुरू होतें. त्यांना भयंकर मार लागला होता. डोकें फुटलें होतें. ओठ फाटला होता. पुढचे दोनतीन दांत पडले होते आणि अंग तर अगदीं ठेचून निघालें होतें.

गांधीजींच्या मदतीला त्यांचे गोरे मित्र धांवून आले होते. त्या मित्रांत मिस्टर डोक हे एक प्रेमळ गृहस्थ होते. त्यांचे घर जवळच्च होतें. तेथें गांधीजींना नेण्यांत आलें. थोडेसे उपचार केल्यावर गांधीजी शुद्धीवर येऊं लागले.

'मीर आलम कुठं आहे ?' शुद्धीवर येतांच गांधीजींनीं पहिला प्रश्न विचारला.

'तुम्हाला बरं वाटतय कां आतां ?' मिस्टर डोकनीं विचारलें.

'मला बरं वाटतंय. पण मीर आलम कुठं आहे तें सांगा अगोदर.'

'त्याला पोलीसांनीं पकडून नेला आहे.'

'छे, छे ! त्याला अगोदर सोडविला पाहिजे. चुकीच्या समजुतीनें त्यानें मला मारलें आहे. त्याचा कांहीं दोष नाहीं. त्याला सोडवा पाहू अगोदर ! माझं करणं त्याला आवडलें नसेल. म्हणून रागाचे भरांत त्यांनें मला मारलें. पण मी त्याच्यावर रागावत नाहीं. मी त्याला क्षमा केली आहे म्हणून कळवा पोलीस अधिकाऱ्यांना !'

'बरं आहे. आपण जरा स्वस्थ पडा पाहूं थोडा वेळ !'

गांधीजी, नंतर तीन चार दिवस मिस्टर डोक यांचेच घरीं राहिलें. मिस्टर डोक आणि त्यांची मुलगी गांधीजीची प्रेमळपणानें सेवा शुश्रुषा करीत होते. चार सहा दिवसांत गांधीजी बरे झाले.

पण सरकारनें दिलेला शब्द पाळला नाहीं. परवाना काढण्याच्या जुलमी कायदा रद्द केला नाहीं. लोकांनीं तडजोडींत ठरलेली परवाना काढण्याची अट पाळली. शेकडों लोकांनीं खुषीनें परवाने काढले होते. तरी सरकारनें कायदा मागें घेतला नाहीं.

सरकारनें दिलेलें वचन पाळलें नाहीं. लोकांनीं सरकारला कांहीं दिवसांची मुदत दिली. त्या मुदतीच्या आंत सरकारनें कायदा रद्द

केला नाहीं तर सर्व परवान्यांची जाहीर होळी करण्याचें ठरलें. तसें सरकारला कळविण्यांत आलें.

मुदतीचे दिवस संपले. शेवटचा दिवस उजाडला पण सरकार-कडून कांहींच उत्तर आलें नाहीं. जुलमी कायदा रद्द झाला नाहीं.

मग परवान्यांची होळी करण्यासाठीं प्रचंड सभा भरली. सभेला सुरवात होणार होती इतक्यांत तारवाला आला. तार सरकारकडून आली होती, पण तारेंत नकार होता.

लोक परवाने जाळावयास अगदीं उत्सुक झाले होते. सरकारचा नकार ऐकतांच त्यांचा आनंद गगनांत मावेनांसा झाला. दोन हजार परवाने जमले होते. त्यांची होळी पेटविण्यांत आली. जुलमी कायदा जाळण्यांत आला.

ज्या लोकांनीं परवाने बरोबर आणले नव्हते त्यांनीं घरीं जाऊन आणले. परवान्यांचा होम चालला होता. आहुती मागून आहुती पडत होत्या.

इतक्यांत एक दांडगा माणूस धांवत गांधीजींच्या जवळ आला. मीर आलमच होता तो! लोकांना वाटलें हा पुन्हा गांधीजींना मारावयास धांवत आहे.

'खेचा, खेचा त्याला मागें!' असें ओरडत लोक त्याच्या मागून धांवले.

तोंच मीर आलमनें जाऊन गांधीजींचे पाय धरले. त्यांच्या पायांवर डोकें ठेवलें. मीर आलमला पकडावयास धांवलेले लोक जागच्या-जागीं थबकले.

मीर आलमच्या येण्यानें सभेंत थोडीशी गडबड झाली होती पण गांधीजींनीं खूण करतांच सगळीकडे शांत झालें.

गांधीजींनीं मीर आलमला वर उठविलें. मीर आलमच्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते. तो डोळे पुसून म्हणाला—

'भाईजी चुकलों मी. मला क्षमा करा. माझी गैरसमजूत झाली. मी पापी चांडाळ आहे. आपण थोर आहांत, शूर आहांत मी भेकड आहे. आजपर्यंत मला आपली खरी योग्यता कळली नव्हती. आज कळली.'

गांधीजींनीं मीर आलमला प्रेमानें मिठी मारली. टाळ्यांचा कडकडाट झाला. लोक आनंदानें जयजयकार करूं लागले. त्यांच्या आवाजानीं सारे आकाश भरून गेले.

शत्रूचा शिष्य झाला. क्षमा हें प्रभावी शस्त्र ठरलें. अहिंसेचा विजय झाला. अत्याचारी अनत्याचारी बनला. केवढा मोठा अमर विजय होता हा !

गांधीजी विजयीवीर नव्हते कां ?

---

## कर्तव्य पालन * * * ५

गांधीजींनीं दक्षिण आफ्रिकेंत 'इंडियन् ओपीनिअन्' (हिंदी लोकमत) या नांवाचें इंग्रजी वर्तमान पत्र काढलें होतें. हिंदी लोकांची गाऱ्हाणी वेशीवर टांगण्यास या वर्तमानपत्राचा फार उपयोग झाला. हें वर्तमानपत्र अद्यापि देखील तिकडे चालू आहे.

यावेळीं मि. वेस्ट या नांवाचे एक युरोपियन सोबती गांधीजींना लाभले होते. 'हिंदी लोकमत' हें वर्तमानपत्र शहरांत न काढतां, शहरापासून थोडें दूर शेतीच्या जागेंत काढावें असें गांधीजी व मि. वेस्ट यांनीं ठरविलें. कारण त्यामुळें खर्चांत पुष्कळ बचत होणार होती.

डरबान पासून थोड्या दूर अंतरावर फिनिक्स येथें मोठी जमीन घेण्यांत आली. तेथें 'हिंदी लोकमताचा' छापखाना उभा करण्यांत आला. लोकांना राहावयासाठीं झोपड्या बांधल्या. त्यांत मंडळी राहूं लागली. सर्व कारभार सुरळीत चालूं झाला.

गांधीजींनीं १९०४ सालीं 'फिनिक्स' नांवाची संस्था स्थापन केली ती आजतागायत उत्तम स्थितींत चालूं आहे.

गांधीजींचे बरोबर फिनिक्सला पुष्कळ मंडळी रहावयास आली. त्यांत सर्व जातीचे व धर्माचे लोक होते. मुलेंहि पुष्कळ होतीं. त्यांच्याकरितां शाळा होती. या शाळेंत गांधीजी स्वतः शिकवीत असत.

एक दिवस सकाळची वेळ होती. टपाल आणण्याचें काम रावजी नांवाच्या गृहस्थाकडे होतें. ते टपाल आणावयास गेले. त्या दिवशीं हिंदुस्थानांतून गांधीजींच्या नांवाची एक तार आली होती. रावजींनीं सर्व टपाल घेतलें व ते गांधीजींच्याकडे जावयास निघाले.

त्यांना वाटेंत गांधीजींचा दुसरा मुलगा मणिलाल भेटला. त्यांनीं गांधीजींच्या नांवचें सर्व टपाल मणिलालजवळ दिलें.

मणिलालनें हिंदुस्थानांतून आलेली तार पाहिली. त्याला ती तार वाचण्याची उत्सुकता उत्पन्न झाली. तारेंत कांहीं तरी वाईट बातमी असणार असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें; कारण आठ दिवसांपूर्वींच त्याचें काका फार आजारी असल्याची तार आली होती.

मणिलालनें तार उघडून वाचली. त्याचे काका वारल्याचीच ती तार होती. नंतर मणिलालनें सर्व टपाल गांधीजींचेकडे नेऊन दिलें.

गांधीजी यावेळीं शाळेंत होते. वर्गांत शिकविण्याचें काम सुरू होतें त्यांनीं तार पाहिली, वाचून घेतली व ठेवून दिली. वर्ग घेण्याचें काम नेहमींप्रमाणें पुढें चालू झालें.

गांधीजी अगदीं रोजच्या प्रमाणें शांतपणें वर्ग घेत होते. रोजच्या सारखें हंसत खेळत शिकविण्याचें काम सुरू होतें गांधीजींच्या चेहेऱ्यावर त्या दुःखदायक बातमीचा कांहीं एक परिणाम झालेला दिसत नव्हता.

गांधीजींचे बंधु वारल्याची बातमी मणिलालपासून सर्व मंडळींना कळली होती. तार वाचतांच वर्ग सोडून गांधीजी बाहेर येतील असें सर्वांना वाटत होतें. गांधीजी आतां येतील, मग येतील म्हणून सर्व-जण वाट पाहात बसले होते.

पण गांधीजींनीं वर्ग सोडला नाहीं. शिकविण्याचें काम थांबविलें नाहीं कीं, ते बाहेर आले नाहींत. त्यांचा ठरलेला दिनक्रम यंत्रा-प्रमाणें सुरळीत चालू होता. त्यांत कोणत्याहि प्रकारें खंड पडला नाहीं कीं कमीजास्त झालें नाहीं.

गांधीजींनीं सर्व काम आवरलें. प्रार्थना झाली. रोजचा ठरलेला सर्व कार्यक्रम संपला होता. आतां मात्र त्यांचा चेहरा उतरलेला दिसूं लागला. त्यावर दुःखाच्या छटा स्पष्ट दिसूं लागल्या. प्रार्थनेला जमलेली मंडळी शांतपणें उभी होती. गांधीजींनीं मंडळींना सांगितलें—

'आज मी वर्ग घेत होतों तेव्हां मला माझे आवडते भाई वारल्याची तार मिळाली.'

'भाईजी, मग आपण वर्ग सोडून बाहेर कां आला नाहीं?' एकानें मध्येंच विचारलें.

मला बाहेर येण्याचा अधिकार नव्हता. त्यावेळीं मी सार्वजनिक कामांत गुंतलों होतों. भाई वारल्याचें मला फार दुःख झालें होतें ही गोष्ट खरी आहे; पण तें माझं एकट्याचं खासगी दुःख होतं. आतां-पर्यंत मी रिकामा नव्हतों. रोजचें माझें काम आतां संपलें आहे.

आतांपर्यंत दुःख करीत बसावयास मला वेळ नव्हता. कारण तो वेळ मी ठराविक कामास अगोदरच दिलेला होता. भावनेपेक्षां कर्तव्य श्रेष्ठ आहे. आतांपर्यंत मी कर्तव्य पालन केलं. आतां मी माझं दुःख करीत बसावयास मोकळा झालों आहे.'

गांधीजींचें बोलणें संपलें. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. सर्व मंडळी गांधीजींचें सांत्वन करून जड अंतःकरणानें निघून गेली.

★

---

## जरीचें उपरणें ★ ★ ★ ६

गांधीजी, नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांना राजकारणांतील आपले गुरु मानतात. नामदार गोखले १९१२ सालीं दक्षिण आफ्रिकेंत गेले होते. गांधीजी मोठ्या प्रेमानें व आवडीनें आपल्या गुरुजींची सेवा करीत. ती सेवा प्रेमाची होती, आपुलकीची होती.

गांधीजी गोखल्यांचे कपडे धूत. त्यांचे बूट पुसून ठेवीत. हें काम करतांना गांधीजींना कमीपणा वाटायचा नाहीं. उलट गुरुजींची सेवा करण्याची संधी आपणास मिळाली. तेव्हां आपण मोठे भाग्यवान आहोत असेंच त्यांना वाटे.

दक्षिण आफ्रिकेंतील जोहान्सबर्ग शहरीं ना. गोखल्यांना मोठी टोलेजंग मेजवानी होणार होती. कितीतरी लोक या समारंभास येणार होते. दक्षिण आफ्रिकेंतील बहुतेक हिंदी लोक या समारंभासाठीं मुद्दाम आले होते. मेजवानी मोठ्या थाटामाटानें होणार होती. तो प्रसंग अत्यंत महत्त्वाचा होता. त्यावेळीं ना. गोखले फार महत्वाचें भाषण करणार होते.

ना. गोखले न्यायमूर्ति रानड्यांना आपले गुरु मानीत असत.

न्या. रानड्यांनीं आपल्या शिष्याला प्रेमाची भेट म्हणून एक जरीचें उपरणें बक्षीस दिलें होतें. ना. गोखले या उपरण्याची अतिशय काळजी घेत असत. विशेष महत्त्वाच्या प्रसंगा खेरीज हें उपरणें ते कधींहि वापरीत नसत.

मेजवानीच्या वेळेला ना. गोखले हे जरीचें उपरणें अंगावर घेऊन जाणार होते. पण उपरण्याची घडी विसकटली होती. तें अगदीं चोळमटून गेलें होतें. त्याला इस्त्री करणें जरुर होते. वेळतर अगदींच थोडा राहिला होता परिटाकडे जाऊन इस्त्री करून आणण्या इतका अवकाश नव्हता.

'मी इस्त्री करूं काय ?' गांधीजींनीं विचारलें.

'हें पहा, मी तुमच्या वकीलीवर विश्वास ठेवीन पण या उपरण्यावर मी तुम्हांस आपली धोबीकला चालवूं देणार नाहीं. या उपरण्याची योग्यता केवढी मोठी आहे व मी त्याला किती जपतो हें तुम्हाला माहीत आहेच. मग या उपरण्याला डाग पडले किंवा कडक इस्त्री होऊन ते जळलं तर ?' ना. गोखले म्हणाले.

'मी डाग पाडणार नाहीं अगर जाळणारहि नाहीं. मला संधी देऊन तर पहा'

'पहा, इस्त्री नीट कराल ना ?'

'मी या कलेंत तरबेज आहे कीं नाहीं तें पहातर खरें !'

'बरं, मग करा तर इस्त्री !'

गांधीजींनीं जपून इस्त्री करण्याची जबाबदारी घेतांच ना. गोखल्यानीं परवानगी दिली.

गांधीजींनीं ताबडतोब इस्त्री आणली. ती पेटविली व इस्त्री करण्यास आरंभ केला.

थोड्या वेळांत त्यांनीं इतकी सुंदर इस्त्री केली कीं, ती पाहून ना. गोखले अगदीं बेहद खूष झाले.

'वा, तुम्ही अगदीं निष्णात परिटहि आहांत की!' गोखले म्हणाले. गांधीजी फक्त हंसले.

★

## खमंग भोजन ★ ★ ★ ७

गांधीजींचें घराणें पूर्वींपासून धार्मिक होतें. गांधीजींच्या आई पुतळीबाई म्हणजे साक्षात् धर्ममूर्तींच होत्या. पुतळीबाई पावित्र्याच्या व पुण्याईच्या मूर्तिमंत पुतळी होत्या. फार नेमनिष्ठ होत्या.

पुतळीबाईंचें सतत कांहींना कांहीं नेमधर्म, उपासतापास चालू असावयाचेच. दररोज पूजाअर्चा केल्याशिवाय व मंदिरांत जाऊन देवदर्शन घेतल्या खेरीज ही माऊली तोंडांत पाणी घेत नसे. त्या कितीतरी प्रकारचीं व्रतें करीत असत. दोन तीन दिवस लागोपाठ कांहीं एक न खातां त्या अगदीं सहजपणें उपवास करीत.

गांधीजींनीं लांब मुदतीचे उपवास पुष्कळ वेळां केले आहेत. याच बाळकडू त्यांना जन्मत:च मिळालें होतें.

पुतळीबाईसारख्या प्रेमळ, साध्वी सासूचें वळण गांधीजींच्या पत्नी कस्तुरबा यांना लागलें होतें. घराण्यांत चालत आलेले नेमधर्म व व्रतें त्या करीत असत. त्यामुळें त्यांच्या मुलांनाहि तेंच वळण लागलें.

गांधीजींचा चौथा मुलगा देवीदास लहान होता. आईप्रमाणें आपणहि एक व्रत करावें असें छोट्या देवीदासास वाटलें. त्यानें गांधीजीच्या जवळ व्रत करण्याची परवानगी मागितली. गांधीजींनीं परवानगी दिली.

हें व्रत आठ दिवसांचें होतें. व्रत संपेपर्यंत मीठ घातलेला कोणताहि पदार्थ खावयाचा नाहीं, असा व्रतांतील नियम होता. मीठ

किंवा मीठ असलेला पदार्थ खाल्ला कीं, व्रत मोडत होतें. आठ दिवस देवीदासास अगदीं आळणी पदार्थ खावे लागणार होते.

देवीदासानें व्रत करण्यास आरंभ केला. दोन तीन दिवस व्यवस्थित पार पडले. त्यानंतर एक दिवस दोन प्रहरीं गांधीजी सर्व मुलांसह जेवावयास बसले होते. कस्तुरबा वाढीत होत्या. सर्वांनीं जेवावयास प्रारंभ केला.

इतक्यांत देवीदास हट्टून बसला. तो जेवेना. तो पानावर हात आखडून अगदीं स्वस्थ बसला. त्याला त्या दिवशीं तिखटामिठाचे खमंग पदार्थ खावयाची इच्छा झाली होती. पण त्याचे जेवणाचे सर्व पदार्थ आळणी होते. फक्त त्याच्यासाठीं वेगळे पदार्थ केले होते. इतरांच्याकरितां खमंग पदार्थ केले होते.

ते खमंग पदार्थ पाहातांच देवीदासाच्या तोंडास पाणी सुटलें. तो व्रत पालनाचे नियम विसरला. देवीदास खमंग पदार्थ मागूं लागला. कस्तूरबा त्याला ते खमंग पदार्थ वाढीनात. देवीदासानें आपलें शेवटचें शस्त्र उपसलें. तो रडूं लागला.

'देवीदास, खमंग पदार्थ खाल्लेतर तुझें व्रत मोडेलना ? व्रत तर तूं स्वतःच आपणहून घेतलं आहेस ना ?' गांधीजींनीं विचारलें.

'होय' देवीदासानें सांगितलें.

'मग घेतलेलें व्रत तूं पाळीत कां नाहींस ? स्वतः घालून घेतलेले नियम स्वतः पाळले पाहिजेत ना !'

देवीदासानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तो अधिकच रडूं लागला. तेव्हां गांधीजींनीं सांगितलें, "व्रत पाळणें तुझें कर्तव्य आहे. तें तूं पाळलें पाहिजेस. तूं भलताच हट्ट धरूं नकोस. तुझं व्रत संपलें म्हणजे मग तूं खमंग पदार्थ खा. जर तूं आपला हट्ट सोडून जेवला नाहींस तर मी सुद्धां जेवणार नाहीं.'

असाच कांहीं वेळ गेला. देवीदासानें आपला हट्ट सोडला नाहीं. तो न जेवतांच पानावरून उठून बाहेर गेला. गांधीजीहि जेवले नाहींत. तेहि तसेच उठले.

सर्वच प्रकार मोठा चमत्कारिक झाला होता. एका बाजूस बाल हट्ट तर दुसऱ्या बाजूस नियम पाळण्याचा आग्रह असा दुहेरी झगडा सुरू झाला. कोणीच माघार घ्यावयास तयार नव्हते.

सर्व मंडळींनीं देवदासीला सांगून पाहिलें, पण कांहींच उपयोग झाला नाहीं.

अशा स्थितींत सायंकाळ झाली. दिवेलागणीची वेळ होत आली. देवीदास गांधीजींचें जवळ गेला व म्हणाला, 'बापूजी, चुकलं माझं! मी पुन्हां कधी असा भलताच हट्ट करणार नाहीं.'

'तुझी चूक तुला कळली ना?'

'होय'

'ठीक आहे. आतां येथून पुढें एक गोष्ट चांगली लक्षांत ठेव. कोणतीहि गोष्ट करावयाची ठरविण्यापूर्वीं त्या गोष्टीचा चांगला विचार करावा. त्याचे परिणाम काय काय होतील ते समजून घ्यावेत. ते भोगण्याची मनाची तयारी करावी आणि मगच ती गोष्ट करावयास सुरवात करावी. सध्यां तूं लहान आहेस, अज्ञान आहेस. पण आपण केलेला नियम आपण स्वतः पाळलाच पाहिजे. ही संवय तुला या वेळेपासूनच लागली पाहिजे. बरं आतां तूं आळणी पदार्थ खावयास तयार आहेस ना?'

'होय.'

'मग चल तर'

देवीदासानें आपला हट्ट सोडला. घरांत आनंदी आनंद झाला. मग बापलेक आनंदानें पोटभर जेवले.

★

## कडू काढा ★ ★ ★ ८

गांधीजी आफ्रिकेहून १९१५ सालीं हिंदुस्थानांत कायमचे राहावयास आले. हिंदी लोकांची मायभूमि जो हिंदुस्थान तो जर स्वतंत्र झाला नाहीं तर जगांत हिंदी लोकांना कोण विचारणार? म्हणून आपल्या मायभूमीची सेवा करण्यासाठीं गांधीजी हिंदुस्थानांत परत आले.

पंडित मदन मोहन मालवीयजींनीं १९१६ सालीं काशीला विश्वविद्यालयाचा पाया घातला. त्यावेळीं तेथें मोठ्या थाटाचे समारंभ चालले होते. समारंभाकरितां मोठा सुंदर मंडप घातला होता. भारी किंमतीच्या बैठकी घातल्या होत्या. किनखापीं छत लावले होते. हंड्या झुंबरें लोंबत होती. मौल्यवान गालिचे आंथरले होते.

या समारंभास मोठमोठे राजे रजवाडे, सरकारी अधिकारी, जमीनदार शेठसावकार व मोठे विद्वान लोक आले होते. सगळा मंडप माणसांनीं फुलून गेला होता. राजे रजवाडे, जमीनदार व शेठसावकार भरजरी कपडे घालून व जडजवाहिरांच्या दागिन्यांनीं नटून थटून आले होते. स्वर्गातला इंद्राचा दरबारच आज चुकून मृत्युलोकावर भरला आहे कीं काय असा भास होत होता.

ह्या समारंभाला हजर राहण्यासाठीं म्हणून एक माणूस मंडपाच्या दाराशीं आला. त्याचा पोषाक अगदी साधा होता. तो पायघोळ धोतर नेसला होता. त्याच्या अंगात लांब सदरा होता. त्यानें अंगावर उपरणें घेतलें होतें, डोक्याला काठेवाडी फेटा बांधला होता. तो आंत जाऊं लागला पण पाहरेकऱ्यानें त्यास अडविलें. तो त्याला आंत सोडीना.

तो माणूस भरजरी कपड्यांनीं व दागदागिन्यांनीं नटला नव्हता. तो उंची विलायती कापडाचा सूट घालून मोटारींतून आला नव्हता. तो पायीं चालत होता. दिसावयास गबाळा दिसत होता. त्यामुळें पहारेकरी त्यास आंत सोडीना.

पंडीत मालवीयजी समारंभाच्या गडबडींत होते. इतक्यांत त्यांना कोणीतरी येऊन सांगितलें कीं, ' गांधीजी बाहेर उभे आहेत. पाहरेकरी त्यांना आंत सोडीत नाहीं. ' हें कळतांच मालवीयजी स्वतः धांवत गेले व गांधीजींना घेऊन आले.

काठेवाडी पोषाखांतील तो साधासुधा माणूस म्हणजेच महात्मा गांधीजी होते.

गांधीजी आपल्या जागेवर जाऊन बसले. कांहीं वेळानें समारंभ सुरू झाला. मोठमोठ्या विद्वानांचीं भाषणें झालीं.

गांधीजी सर्व भाषणें शांत चित्तानें ऐकत होते. सर्व देखावा शांत नजरेनें पाहात होते.

गांधीजींना बोलण्याची विनंती करण्यांत आली. गांधीजी बोलावयास उभे राहिले. त्यांनीं बोलावयास सुरवात केली.

' भाइओ और बहनो ! '

सर्व लोकांना आश्चर्याचा धक्का बसला. कारण गांधीजींनीं हिंदींत बोलावयास सुरवात केली होती. आतांपर्यंतची सर्व भाषणें इंग्रजींत झालीं होतीं. हिंदीत बोलणारे गांधीजीच पहिले होते. ही गोष्ट धक्का देणारी पण फार महत्वाची होती.

गांधीजी बोलूं लागले. खरें खरें होतें तेंच ते बोलत होते. पण सत्य हें नेहमींच पेढ्यासारखें गोड नसतें, तें पुष्कळ वेळां कोयनेलासारखें कडू असतें.

उंची वस्त्रांनीं सजलेल्या, जडजवाहिरांच्या दागिन्यांनीं नटलेल्या राजे महाराजांना गांधीजी उपदेशाचा कडू काढा पाजीत होते. ते राजे-

रजवाड्यांना भ्याले नाहींत. ते अंतःकरणापासून बोलत होते. त्यांचें शब्द जळजळीत होते. राजे लोकांना उद्देशून ते निर्भयपणें बोलूं लागले—

'संस्थानांतील प्रजा दुःखी कष्टी आहे दारिद्र्याच्या खाईत होरपळत आहे. अज्ञान अंधकारांत पिचत आहे. भुकेनें तडफडत आहे. थंडीनें कुडकुडत आहे. अशा परिस्थितींत या सर्व राजे महाराजांना हे जडजवाहिराचे मौल्यवान दागिने घालण्याचा काय अधिकार आहे?

राजाजवळ असलेली संपत्ति ही राजाच्या मालकीची नसून ती प्रजेची ठेव आहे. राजा या ठेवीचा फक्त चौकीदार आहे. मग ही ठेव प्रजेच्या संमतीशिवाय प्रजेची परवानगी न घेतां वापरण्याचा राजे लोकांना मुळींच अधिकार नाहीं. ही प्रजेची ठेव प्रजेच्या सुखसोयी-साठीं, प्रजेच्या कल्याणासाठींच त्यांनीं खर्च केली पाहिजे.'

गांधीजींचें भाषण कळकळीचें पण न मानवणारें होतें. त्यांच्या भाषणानें खळबळ उडाली. राजे रजवाडे निघून गेले व सभा संपली.

★

## कंगालांचा पुढारी ★ ★ ९

दक्षिण आफ्रिकेंत सत्याग्रह सुरू करीतोपर्यंत गांधीजी युरोपियन पद्धतीचा पोशाख करीत असत.

दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाचे वेळीं ते फक्त सदरा व विजार घालीत असत. पुढें हिंदुस्थानांत येऊन राहिल्यावर ते काठेवाडी पद्धतीचा पोशाख करूं लागले.

त्यावेळीं ते पायघोळ धोतर नेसत. लांब सदरा घालीत. अंगावर उपरणें घेत व काठेवाडी फेटा बांधीत असत.

पुढें गांधीजी हिंदुस्थानभर फिरले. ओरिसा प्रांतातून त्यांचा दौरा चालला होता. फिरतां फिरतां ते एका खेडेगांवांत आले.

गांधीजींनीं तेथील घरें पाहिली. घरें कसली ? गवताच्या व कळकाच्या झोपड्या होत्या त्या ! गांव घाणीनें भरलें होतें.

तें गांव स्वच्छ करावयाचें असें गांधीजींनीं ठरविलें. त्यांनीं हातांत खराटा घेतला व रस्ता साफ करावयास सुरवात केली. तें पाहून मदतीला लोक आले. गांवाची साफ सफाई करण्याचें काम जोरांत सुरू झालें. सर्व रस्ते स्वच्छ झाले. स्वयंसेवकांनीं लोकांच्या आंगणांतील केरकचरा काढून टाकला. विहीरीच्या आसपासचे खड्डे बुजविले. चिखल भरून टाकला.

याप्रमाणें गांवाची बाह्य स्वच्छता झाली. पण लोक कुठें स्वच्छ होते. त्यांचें अंग घाणरडें होतें. कपडे घाणरडे होते. ते आंघोळ करीत नसत कीं, कपडे धूत नसत.

गांधीजी हिंडत हिंडत एका झोपडीजवळ आले. ती झोपडी अगदीं मोडकळीला आली होती. एका गरीब कुटुंबाचे घर होतें तें !

त्या झोपडीला दार नव्हतें. मग कडी कुलूप कोठून येणार ? फक्त गुराढोरांना आंत येतां येऊं नये एवढीच कांट्यांची झडप लावली होती गांधीजींनीं झोपडीजवळ जाऊन डोकावून पाहिलें.

त्या झोपडींत पेटी नव्हती, फडताळ नव्हतें. धान्याच्या कणगीं नव्हत्या. त्या गरीब कुटुंबाचा सारा संसार गाडग्या मडक्यांत भरलेला होता.

झोपडींत एक बाई आपल्या लहान मुलाला घेऊन बसली होती. ती एक फाटकें तुटकें जुनेर नेसली होती. त्या जुनेरानें त्या बाईचें अंग पुरतें झांकलेलेंहि नव्हतें. लहान मूल तर अगदीं उघडें होतें.

गांधीजींनी एका स्वयंसेवकास जवळ बोलावून बाईस बाहेर हांक मारण्यास सांगितलें.

स्वयंसेवकानें त्या बाईला बोलावलें पण ती बाहेर येईना,

'तुम्ही रोज आंघोळ करता काय? मुलाला आंघोळ घालता काय? असें त्या बाईस विचारायला गांधीजींनी त्या स्वयंसेवकास सांगितलें ती बाई थोडा वेळ थांबून बोलूं लागली. बोलतांना तिचा स्वर दाटून आल्यासारखा गांधीजींना वाटला. बाई बसल्या जाग्यावरूनच बोलूं लागली, 'आंघोळ करतांना लावून घ्यायलासुद्धां दुसरं धडूत माझ्यापाशीं नाहीं. मग मी कशी आंघोळ करूं?'

त्या झोपडींतील देखावा पाहून गांधीजींना वेदना झाल्या. त्या बाईचे शब्द त्यांच्या अंतःकरणाला लागले. त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले.

गांधीजींना दरिद्री भारत मातेचें दर्शन झालें. फक्त एका जुनेरावर आयुष्य ढकलणाऱ्या लाखो, कोट्यावधि माता व भगिनी त्यांच्या डोळ्यापुढें दिसूं लागल्या. तत्काळ त्यांनीं प्रतिज्ञा केली.

'मलाहि एका वस्त्रानेंच राहूं दे.'

आणि त्या दिवसापासून गांधीजींनीं फेटा टाकून दिला. टोपी घालावयाची बंद केली. सदरा घातला नाहीं. अंगावर उपरणें घेतलें नाहीं.

गांधीजी पायघोळ धोतरा ऐवजी खादीचा जाडाभरडा पंचा नेसूं लागले. ते अगदीं उघडे असतात. फार झालें तर कधीतरी एखादें खादीचें उपरणें त्यांच्या अंगावर असतें.

गरीबांच्या, शेतकऱ्यांच्या आयुष्याशीं गांधीजी एकरूप झाले आहेत. म्हणूनच ते कंगालांचे पुढारी बनले आहेत.

★

गांधीजी विलायतेस चालले होते. त्यांचा बोटीवरचा वेळ मजेंत जात होता. त्यांना बोटीवर एक गोरा माणूस भेटला. कवि होता तो ! तो दररोज पांच सात पानें खरडून गांधीजींना वाचावयास देत असे. त्यांच्या लिखाणांत हिंदुस्थान व हिंदी लोक यांची भरपूर नालस्ती असावयाची.

गांधीजी त्या गोऱ्या माणसानें दिलेले कागद घेत. त्या कागदांना लावलेली टाचणी तेवढी काढून आपल्या डबीत ठेवीत व कागद केराच्या टोपलीत टाकून देत.

ही गोष्ट त्या कवी महाशयांना कळली. तो अगदीं संतापून गेला व तावातावानें गांधीजींचे जवळ येऊन म्हणाला 'कायहो मिस्टर गांधी, माझं लिखाण तुम्ही केराच्या टोपलींत फेकून देतां म्हणे ? त्यांत तुम्हाला महत्वाची गोष्ट कांहींच आढळून आली नाहीं.'

'मला महत्वाची वाटलेली वस्तु मी मघांच डबींत जपून ठेवली आहे. फक्त कचरा तेवढाच मी टोपलींत टाकला आहे. गांधींजींनीं शांतपणें उत्तर दिलें.

गांधींजींचें उत्तर ऐकताच कवी राजांचा चेहरा पाहाण्यालायक झाला. ते काय समजावयाचें तें समजून मुकाट्यानें चरफडत निघून गेले.

गांधीजींची आगबोट पोर्टसय्यद बंदरांत थांबली होती. इजिप्त-मधील पुढाऱ्यांचे शिष्टमंडळ गांधीजींना भेटावयास बोटीवर आले. भेट झाली. शिष्टमंडळांतील एका सद्‌गृहस्थांनीं गांधीजींना एक मधाचा बुधला भेट म्हणून दिला.

तो मध फार चांगला व भरपूर होता. दर रोज जेवतांना गांधीजी तो मध घेऊं लागले.

गांधीजी लंडनला पोहचले. तेथें ते गरीबांचे वस्तींत राहात होते. गोलमेज परिषद सुरू झाली. गांधीजींना कामासाठीं फार दूर जावें लागत असे. ते जेवावयास सुद्धां घरीं परत येत नसत. कामाच्या ठिकाणींच आपलें जेवण घेत.

एक दिवस गांधीजी महत्वाच्या कामाकरितां गेले होते. त्यादिवशीं ते तिकडेच जेवण करणार होते. जेवणाची वेळ झाली. बरोबरची मंडळी घरून जेवण घेऊन आली. पण चुकून मध आणावयाचा विसरला.

एका गृहस्थचे लक्षांत ती गोष्ट आली. ते तसेंच धांवत गेले. व जवळच्या दुकानांतून त्यांनीं मधाची बाटली विकत आणली.

गांधीजी जेवावयास बसले. त्यांनीं मधाची बाटली पाहिली मध विकत आणल्याचें त्यांना आवडलें नाहीं. त्यांनीं विचारलें—'घरीं भरपूर व चांगला मध असतांना हा दुसरा विकत कां आणलात ?'

'मध घरून आणावयाचा विसरून राहिला बापूजी !'

'मग एक दिवस मध नसतां तर चाललं नसतं कां माझं ? विनाकारण पैसा खर्च करणं चांगलं नव्हे. पैशाचा अपव्यय होत नाहीं का हा !'

विलायतेतील काम संपतांच गांधीजी स्वदेशी परत आले. नंतर कांहीं दिवसानीं त्यांनीं सर्व हिंदुस्थानभर दौरा काढला.

एक दिवस गांधीजींचा हात पुसावयाचा रुमाल कोठें सांपडेना. सर्वजण हुडकून दमले. गांधीजींनीं रुमाल मागितला. एका स्वयंसेवकानें त्यांना रुमाल नेऊन दिला.

स्वयंसेवकानें दिलेला रुमाल आपला नव्हे हे त्यांच्या चटकन् लक्षांत आले.

'हा रुमाल माझा नव्हे. हा मला नको आहे. माझा नेहमींचा रूमाल कोठे आहे तो आणा.'

स्वयंसेवक न बोलतां तसाच उभा राहिला. त्यांचा नेहमीचा रुमाल हरवला हें कोणीच सांगेना.

शेवटीं महादेवभाई देसाई गांधीजींच्या जवळ जाऊन म्हणाले, 'बापूजी, तुमचा रुमाल मागील मुक्कामांत कुठंतरी हरवला आहे. तो सांपडेना म्हणून हा दुसरा पाठविला होता.'

'छे, छे! मला दुसरा रुमाल नको. माझा तो रुमाल आणखी चार महिने तरी टिकला असतां. बरं असो! मी आतां चार महिने रुमालच वापरणार नाहीं.'

संपत्तीची उधळपट्टी गांधीजींना आवडत नाहीं. ते राष्ट्राच्या पैन् पैला जपत असतात.

★

---

## नंगा फकीर ★ ★ ★ ११

१९२९ च्या डिसेंबर महिन्यांत कॉंग्रेसनें संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास केला. एकोणीसशे तीस सालीं साऱ्या देशभर सत्याग्रहाचा वणवा पेटला होता. सरकारनें गांधीजींना पकडून नेलें. त्यांना येरवड्याच्या तुरूंगांत ठेविलें. पण त्यांनीं सुरू केलेली स्वातंत्र्याची लढाई सरकार बंद करूं शकलें नाहीं.

सर्व हिंदुस्थानभर सरकारच्या अधिकाऱ्यांचा नंगा नाच सुरू झाला. लोक जुलमी व अन्यायाचे कायदे मोडूं लागले. मिठागरें लुटली गेलीं. शिंदीची झाडें तोडण्यांत आलीं. जंगल कायदा मोडण्यात आला. कायदेभंगाच्या ज्वाला जोरजोरानें पसरूं लागल्या.

ठिकठिकाणीं लाठीमार झाले. गोळीबार झाले. लोकांच्या अंगावर घोडेस्वार घातले. कित्येकांची डोकीं फुटलीं. पुष्कळ जखमी झाले, शेकडों जागच्याजागीं ठार झाले. पण पुरुष भ्याले नाहींत स्त्रिया गांगरल्या नाहींत कीं मुलें घाबरलीं नाहींत.

लहान लहान मुलें प्रभात फेऱ्या काढीत होतीं. 'झंडा ऊँचा रहे हमारा' म्हणत झेंडे घेऊन मिरवीत होतीं. 'भारत माता की जय' 'महात्मा गांधी की जय' म्हणून मोठमोठ्यानें जयजयकार करीत होतीं. सरकारनें बंदी घातलेलीं कॉंग्रेसचीं पत्रकें जाहीर रीतीनें विकीत होतीं.

मुलांनीं लाठीमार धैर्यानें सहन केला. फटके खाल्ले. बंदुकीच्या गोळ्या छातीवर झेलल्या. पण तीं सरकारला शरण गेली नाहींत.

शेवटीं वाटाघाटी सुरू झाल्या. सरकारनें तडजोड करावयाचें ठरविलें. गांधीजींना बिनशर्त तुरुंगांतून सोडून दिलें. सर्व पुढाऱ्यांची व सत्याग्रही वीरांची सुटका झाली. कॉंग्रेसवरील बंदी उठविण्यात आली.

सत्याग्रह यशस्वी झाला. कायदेभंगाचा विजय झाला. स्वतःच्या उपयोगाकरितां समुद्रकांठचें मीठ नेण्यास परवानगी मिळाली. जगलकायदा थोडा ढिला करण्यांत आला.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याविषयीं वाटाघाटी करण्यासाठीं, सर्व पक्षाच्या लोकांची विलायतेंत एक परिषद भरविण्याचें सरकारनें ठरविलें.

कॉंग्रेसचे एकुलतेएक पुढारी म्हणून गांधीजींनीं गोलमेज परिषदेस जावें असें ठरलें.

सर्व तयारी झाली. हिंदुस्थानचे सर्वश्रेष्ठ पुढारी व दरिद्रीनारायणाचे वकील असलेले महात्मा गांधीजी लंडनला जाण्याकरितां बोटीवर चढले. त्यांचा विलायतेचा प्रवास सुरू झाला.

विलायतेंत फार भयंकर थंडी असते. नखशिखांत लोकरीचे गरम कपडे घालूनहि थंडी आवरत नाहीं. म्हणून बरोबरच्या मंडळींनीं गांधीजींच्या करितां खूप कपडे बरोबर घेतले. बोटींत गांधीजींनीं हे कपडे पाहिले, त्यांनीं विचारलें—

'माझ्याकरितां हे इतके कपडे कशाला घेतले आहेत? शेतकऱ्यांचा व मजूरांचा प्रतिनिधी म्हणून मी चाललो आहे. आपल्या शेतकऱ्यांजवळ व मजूरांजवळ इतके कपडे आहेत कां? आमचे शेतकरी व मजूर दरिद्री आहेत. त्यांच्याजवळ अंग झाकण्याइतके सुद्धां कपडे नाहींत. मग इतके कपडे बरोबर घेऊन गेल्यावर, त्यांचा प्रतिनिधि म्हणवून घेण्याचा मला काय अधिकार आहे? परत पाठवून द्या हे सर्व कपडे'

एडनहून बहुतेक कपडे परत पाठविण्यांत आले. यावेळीं गांधीजींचे जवळ एक साडेसातशे रुपयाची शाल होती. ती त्यांनीं बोटीवर सातहजार रुपयास विकून टाकली व ते पैसे राष्ट्रकार्यास दिले.

गांधीजी खादीचा पंचा नेसून व फक्त चादर पांघरून विलायतेस गेले. ते ह्याच पोषाखांत तेथें सर्वत्र हिंडत होते. तेथें ते बरेच दिवस राहिले पण लंडनच्या कडक थंडीनें त्यांना कांहीं त्रास झाला.

बकिंगहॅम राजवाड्यांतून गांधीजींना बोलावणें आलें. मरहूम बादशहा पंचम जॉर्जनीं त्यांना आपल्या भेटीस बोलावलें होते. ब्रिटिश साम्राज्याचे बादशहा गांधीजींना भेटू इच्छित होते.

गांधीजी ठरलेल्या वेळीं बकिंगहॅमराजवाड्यांत गेले. पण कसे? मौल्यवान कपडे घालून, किंवा भरजरी पोषाख करून नव्हे तर आपल्या नेहमींच्या पोशाखांत म्हणजे पंचा नेसून व चादर पांघरून ते गेले होते.

ठरल्याप्रमाणें भेट झाली. खादीचा जाडा भरडा पंचा नेसून खादीची चादर पांघरून व पायांत वहाणा घालून भारताचा नंगा फकीर सम्राट पंचम जॉर्जना भेटून आला.

भारताचा केवढा मोठा गौरव होता हा !

★

## कॉफीचा पेला ★ ★ १२

गांधीजींनीं हिंदुस्थानांत आल्यानंतर अहमदाबादला कायम राहण्याचें ठरविलें. साबरमतीच्या कांठाला आश्रमासाठीं जमीन घेण्यात आली. लवकरच तेथें जरूर त्या झोपड्या बांधण्यांत आल्या. या आश्रमाचें नांव ' सत्याग्रह आश्रम ' ठेवण्यात आलें.

आफ्रिकेंतील, फिनिक्सच्या आश्रमाप्रमाणेंच याहि आश्रमांतील व्यवस्था होती. एकाच कुटुंबांतील माणसांप्रमाणें आश्रमांत सर्व माणसें वागत असत. सर्वजण आपुलकीनें कामें करीत.

या सत्याग्रह आश्रमांत पायखाना स्वच्छ करण्यापासून तें खादी विणण्यापर्यंत सर्व कामें आश्रमांत रहाणाऱ्यांना आळी पाळीनें करावी लागत.

आश्रमांत जेवण अगदीं साधें, ठराविक पद्धतीचें असायचें ! तेथें तंबाखू, चहाकॉफी गिरणीचें कापड यांना मज्जाव होता. चहाकॉफी ऐवजीं सकाळीं न्याहरीला गव्हाची सुरेख कांजी मिळायची.

या आश्रमांत हिंदुस्थानच्या दूरदूरच्या भागांतले चांगले चांगले कार्यकर्ते येऊन कांहीं दिवस राहात, सर्व शिकून घेत आणि परत आपआपल्या गांवीं कामाला जात.

एकदां असाच एक मद्रासकडील मुलगा आश्रमांत राहायला आला होता. त्याचें नेहमीचें अन्न म्हणजे भात. त्यामुळें आश्रमांतलें जेवण न पचल्यानें कांहीं दिवसांनीं तो आजारी पडला. आश्रमांतील आजारी माणसांकडे लक्ष देण्याचें काम खुद्द गांधीजींनीं आपल्याकडे घेतलेलें होतें. त्यामुळें नवीन माणसांना वाटे कीं आजारी पडावें म्हणजे तरी गांधीजींचा प्रेमळ सहवास, थोडाका होईना आपल्याला मिळेल.

या मद्रासी मुलाकडे रोज गांधीजी येत, त्याची विचारपूस करीत. त्याला त्यांनीं एकदोन दिवस कांहींहि खायला दिलें नाहीं. त्यामुळें त्या मुलांला लवकर बरें वाटूं लागलें. पण त्याला हिंडतां फिरतां येत नव्हतें. तो अंथरुणावर पडून असायचा.

एके दिवशीं रात्रीं नऊ वाजतां तो मुलगा अंथरुणावर पडून राहिला असतां त्याला कॉफी घ्यावी अशी फार इच्छा झाली. मद्रासकडच्या लोकांना कॉफी फार आवडते. त्यांना तिचें व्यसनच असते म्हणाना! तेव्हां मुलाला वाटलें, 'मला यावेळीं कॉफी प्यायला मिळाली तर किती बरं होईल!' पण त्याला माहीत होतें कीं आश्रमांत चहा कॉफीला बंदी आहे. शिवाय यावेळीं आश्रमांत शुकशुकाट झाला होता. सायंकाळी प्रार्थना झाल्यानंतर तासादीडतासांत सर्व मंडळी झोपी जात. तेव्हां त्याला आपल्या मनाची इच्छा मनांतच ठेवावी लागली.

आज सबंध दिवसांत बापूजी त्याच्या भेटीला आले नव्हते. आज त्यांना खूप काम पडलें होतें. प्रार्थनेच्या वेळेपर्यंत ठिकठिकाणाहून आलेल्या पुढारी मंडळीशीं बोलणें, मुलाखती देणें, इत्यादि कामें चालली होतीं.

प्रार्थना झाल्यानंतर आज आलेल्या पत्रांना उत्तरें लिहावयाला ते बसले आणि तें काम संपावयास रात्रीचे अकरा वाजले.

काम करून करून त्यांचें शरीर थकून गेलें होतें. आतां झोपायचें म्हणून त्यांनीं अंथरुणावर अंग टाकलें तोंच त्यांना त्या आजारी मद्रासी मुलाची आठवण झाली. त्याबरोबर ते लगेच तसेच पायांत खटावा घातल्या आणि त्या मुलाला जिकडे ठेवलें होतें तिकडे ते निघाले.

यावेळीं आश्रमांत जिकडे तिकडे शांत झालें होतें. सर्व माणसें झोपलीं होतीं. झाडेंहि झोपलीं होतीं पण वारा झोपला नव्हता. चंद्र झोपला नव्हता. तारे झोपले नव्हते. साबरमती नदीहि झोपली नव्हती.

तो मद्रासी मुलगा झोंपण्याची तयारी करीत होता. कॉफी त्याच्या डोक्यांतून गेली नव्हती. इतक्यांत खटावांचा 'चट्, चट्' असा रोजचा ओळखीचा आवाज त्याच्या कानीं आला, आणि त्याच्या पाठोपाठ गांधीजींचे प्रेमळ डोळे व हांसरे तोंड त्याच्या डोळ्यांना दिसलें.

मुलाचा चेहरा खुलला. आई भेटावी तसा त्याला आनंद झाला.

'क्यों ! कैसे हो ?' गांधीजींनीं विचारलें.

'बरं आहे, बापूजी' मुलानें उत्तर दिलें.

'भूकबीक लागली आहे का आज ?'

'हो, बापूजी'

'पण उपमा अन् दोशा नाहीं मिळायचा हं इथं दुसरं काय पाहिजे तुला सांग.'

'कॉफी प्यावीशी वाटते, बापूजी.' मुलगा भीत भीत म्हणाला.

'अरे लबाडा, कॉफीची आठवण झाली का तुला आज? कांहीं हरकत नाहीं. गरमगरम कॉफी व थोडा भाजलेला पाव आज तुला खायला हरकत नाहीं.'

असें म्हणून गांधीजी तेथून निघाले. दहा मिनिटें गेलीं. पंधरा झालीं. वीस झालीं. मुलाला वाटलें यावेळीं रसोडा (स्वयंपाकघर) बंद झालेला असणार. बा (कस्तूरबा) निजलेल्या असणार. यावेळीं कसची कॉफी मिळते!

इतक्यांत पुन्हा तोच खडावांचा आवाज त्याच्या कानांवर आला आणि एका हातांत कंदील आणि दुसऱ्या हातांत रुमाल झांकलेलें तबक घेऊन आंत आले.

त्यांनीं तबकावरील रुमाल काढला. सबकांत गरम गरम कॉफीची किटली होती. एक कपबशी होती आणि दुसऱ्या एका बशींत लोणी लावून भाजून आणलेला पावाचा तुकडा होता.

तो मुलगा गांधीजींच्या तोंडाकडे पाहातच राहिला.

'आश्रमांत अन् कॉफी? आणि तीहि दुसऱ्या कोणी नाहीं, खुद्द गांधीजींनीं आणली!' आपण स्वप्नांत आहों कीं जागे आहों हें त्याला कळेना.

'हं गरम आहे तोंवर घेऊन टाक ती कॉफी. तुला काय वाटतं? उपमा आणि दोशा मला करतां येणार नाहीं तरी मद्रासकडच्या सारखी कॉफी मला करतां येणार नाहीं, असं तूं समजलास काय? पहा पिऊन. कॉफी साधली आहे कीं नाहीं ती. मी जातों आतां. भांडी कुणीतरी घेऊन जाईल.'

असें म्हणून हंसत हंसत गांधीजी निघून गेले.

केवळ कल्पनेंत चाखलेली कॉफी प्रत्यक्ष पितांना त्या मुलाला जितका आनंद झाला, त्याहून कितीतरी पटीनें गांधीजींनीं स्वतः आपल्यासाठीं कॉफी करून आणली या गोष्टीचा आनंद झाला त्याला!

त्याच्या मनाच्या डोळ्यांना दिसलें—

बा निजल्या आहेत. प्यारेलालहि निजले आहेत. कोणालाहि न उठवितां गांधीजी रसोड्यांत गेले आहेत. शेगडी पेटवून कॉफी तयार करीत आहेत, पाव भाजीत आहेत..........

मुलाचें पोट आणि हृदय दोन्हीं गांधीजींच्या प्रेमानें तुडुंब भरून गेलीं.

★

## कौमुदीचे दागिने ★ ★ १३

अस्पृश्यता म्हणजे महार, मांग, वगैरेंना शिवायचे नाहीं. हा हिंदुधर्माला लागलेला मोठा डाग आहे असें गांधीजी समजतात. 'अस्पृश्य' हा शब्द देखील त्यांना ऐकवत नाहीं. महार, मांग, भंगी इत्यादि लोकांना ते 'हरिजन' म्हणतात. 'हरिजन' म्हणजे हरिचा –देवाचा–माणूस. कारण ते साफसफाई करून लोकांची मोठी सेवा करतात.

हरिजनांचे चांगलें व्हावें याकरितां ते रात्रंदिवस झटत असतात. त्यासाठीं त्यांनीं हरिजन–सेवकसंघाची स्थापना केली. त्यांनीं पुष्कळ देवळें हरिजनांना खुलीं करायला लावलीं. त्यांनीं हरिजनांच्या सेवा-कार्यासाठीं फंड गोळा करण्याचें ठरविलें. त्यांनीं त्याकरितां सर्व हिंदुस्थानभर दौरा काढला.

मलबार प्रांतांतून गांधीजींचा दौरा सुरू होता. बदगरा येथें व्याख्यान होतें. तें संपल्यावर तेथें मिळालेल्या देणग्यांची विक्री करण्यास गांधीजी उभे राहिले इतक्यांत पंधरा सोळा वर्षांची एक मुलगी त्यांच्याजवळ आली.

त्या मुलीचें नांव कौमुदी होत. तिनें आपल्या हातांतील सोन्याची बांगडी देत म्हटलें, मला आपली सही घाल काय ?

गांधीजी तिनें पुढें केलेल्या वहींत सही देऊं लागले तोंच तिनें दुसरी बांगडी काढून गांधीजींच्या पुढें ठेविली.

'दोन्ही बांगड्यांची गरज नाहीं, एक बांगडी घेऊनसुद्धां मी सही देईन' गांधीजींनी सांगितलें.

गांधीजींच्या या बोलण्याला उत्तर म्हणून तिनें आपली मोहन माळ काढून त्यांच्यापुढें ठेविली.

'तुझ्या वडिलांची या गोष्टीला परवानगी आहे काय ?' गांधीजींनीं विचारले.

कौमुदी कांहींच बोलली नाहीं. तिचें काम मुकाट्यानें सुरू होतें. ती आपल्या कानांतील रत्नजडीत कुंडलें काढीत होती. तिनें तीं रत्नजडीत कुंडलें काढून गांधीजींच्या पुढें ठेविलीं.

लोकांनीं टाळ्यांचा गजर केला. त्या आवाजानें दाही दिशा दणाणून गेल्या. लोक टाळ्या वाजवून कौमुदीच्या त्यागाचें कौतुक करीत होते. त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता.

'तूं ह्या वस्तु देत आहेस पण या गोष्टीला तुझ्या वडिलांची परवानगी आहे काय ?' गांधीजींनीं पुन्हा एकदां कौमुदीला विचारलें.

कौमुदी लाजली होती. ती कांहीं बोलली नाहीं. इतक्यांत कोणी-तरी येऊन गांधीजींना सांगितले कीं, तिचे वडील या सभेंत हजर

आहेत व ते लिलाव चाललेल्या मानपत्रावर रक्कम बोलून अगदीं उदारपणें मदत करीत आहेत.

'तूं आतां कधींहि परत अंगावर दागिने घालतां कामा नयेत' गांधीजींनीं तिला सांगितलें.

'मला आपली अट कबूल आहे व ती मी मरेपर्यंत पाळीन' कौमुदीनें निश्चयपूर्वक सांगितलें.

गांधीजींनीं तिच्या तिच्या वहींत पुढील मजकूर लिहिला.

'तूं केलेला त्याग हाच तूं टाकून दिलेल्या दागिन्यापेक्षां खरा दागिना आहे'

ह्या मजकुराखालीं गांधीजींनीं आपली सही केली.

कौमुदीनें केलेला दागिन्यांचा त्याग मोठा होता. सत्कार्यांकरितां एकदां सोडून दिलें ते कायमचें सोडलें हे व्रत किती मोठें आहे !

कौमुदी ही लहान मुलगी होती पण तिचें व्रत केवढें मोठें होतें !

★

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ...... ता दि
दि. ......

IRBK-0103018

IRBK-0103018

# बालमित्र माला

★

## आमचे सण

१ तिळगूळ घ्या गोड बोला
२ महाशिवरात्र
३ होळी
४ सोन्याचा दसरा
५ नागपंचमी
६ वसंत गौरी
७ राखी पुनव
८ हरितालिका
९ मंगलमूर्ति
१० नाताळ
११ सती सावित्री

## इतर

१ राया अथवा बालमूर्ति
२ गुलाबकळी
३ फुलराणी

★

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर